# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २७/०४/२०२५ (शनिवार)**

---

### नागपुर ग्रामीण जिल्हयात खापरखेडा पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांवर गुन्हा नोंद , ५ अग्निशस्त्रांसह, ८ ॲड्रॉईड मोबाईल आणि अंमली पदार्थ जप्त, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर आणि उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान यांची संयुक्त कारवाई

दिनांक २६/०४/२०२५ रोजी श्री अनिल मस्के ,उपविभागिय पोलीस अधिकारी , तथा सहा. पोलीस अधिक्षक सावनेर यांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, **सावनेर मधील गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे, वार्ड नं. ३ चनकापूर हा वलनी येथील अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग च्या घरी हजर असुन त्यांच्या कडे अग्निशस्त्रे आहे.** अशी माहीती प्राप्त होताच श्री अनिल मस्के यांनी तात्काळ सदर माहीती मा.श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांना दिली.त्यांच्या मार्गदर्शनात श्री अनिल मस्के यांनी सदर माहीती श्री संतोष गायकवाड उपविभागिय पोलीस अधिकारी,कन्हान यांना देवुन केळवद पोलीसांचे एक पथक तयार करून रवाना केले. श्री संतोष गायकवाड यांनी सुध्दा उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय कन्हान येथील अंमलदाराचे पथक तयार केले. उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान यांचे पथक ,केळवद चे प्रभारी अधिकारी श्री अनिल राउत ,सहा.पोलीस निरीक्षक आणि पथक असे घटनास्थळी आरोपी अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग याचे घरी वार्ड क्र ३ वलनी येथे पोहचले. पोलीसांना पाहुन आरोपी **अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग** यांने उडवाउडवीची उत्तरे दिली. खबरेप्रमाणे त्याच्या घरी पाहीजे आरोपी नामे **आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा** आणि **गब्बर दत्तूजी जुमळे, वय ३०वर्षे, रा. वार्ड नं. ३ वलनी** हे मिळुन आले. आरोपीतांनी पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला परंतु पोलीसांनी शिताफितीने तिन्ही आरोपीतांना पकडले. तिन्ही आरोपीजवळ प्रत्येकी एक अग्निशस्त्र मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपी आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा याच्या ताब्यातुन एक अग्निशस्त्र माउजर आणि एक मोबाईल आणि सिम जप्त केले. २. आरोपी नामे गब्बर

दत्तूजी जुमळे  याच्या ताब्यातुन एक अग्निशस्त्र माउजर जप्त केले.३. आरोपी नामे  अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग याच्या ताब्यातुन एक अग्निशस्त्र माउजर आणि मोबाईल आणि सिम कार्ड जप्त केले. आरोपीच्या घरझडतीमध्ये दोन देशी बनावटीचा कट्टे , ३६ जिवंत काडतुसे, २ रिकाम्या पुगळी , ६ अॅड्रॉईड फोन आणि १०२८.०५ ग्रॅम  अंमली पदार्थ गांजा  सदृश्य वनस्पती व ईतर  साहीत्य मिळुन आले.

**सदर कारवाई मध्ये पोलीसांनी ५ अग्निशस्त्रे, ३६ जिवंत काडतुसे, २ रिकाम्या पुगळी, ८ अॅड्रॉईड फोन ,सिमकार्ड आणि १०२८.०५ ग्रॅम  अंमली पदार्थ गांजा सदृश्य वनस्पती व ईतर साहीत्य असा एकुण  २,७१,८०० रु किंमती चा  मुद्देमाल जप्त केला.**

**आरोपी नामे १) आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे, वार्ड नं. ३ चनकापूर, २) अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग, वय २९ वर्षे, रा. बलनी, ३) गब्बर दत्तूजी जुमळे, वय ३०वर्षे, रा. वलनी  यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम ३,५,२५ भारतीय शस्त्र अधिनियम सहकलम ८ (सी) ,२० (बी) (२), २९ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद तिन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**





## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद आरोपी अटक, केळवद पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक २६/०४/२०२५ रोजी केळवद पोलीस पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, मध्य प्रदेश पांढुर्णा कडुन केळवद मार्गे नागपूर कडे प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या

आधारे पोलीसांनी बिहाडा फाटा येथे नाकाबंदी केली असता पाढुर्णा कडुन कार क्र एम. एच—४०/बी.जे—२४४१ येतांना दिसली. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आाला. वाहन चालक **आरोपी नामे जानराव तुळशीराम कावळे, वय—६५ वर्ष रा. बाजार रोड, टाकळघाट, ता.हिंगणा, जि.नागपुर** याचे ताब्यातुन **१) सुगंधित जनम ५३५ तबांखु ब्रॅन्ड ५०० ग्रॅम क्षमतेच्या एकुण ८० कंपनी पॅकबंद पाकीटे, प्रती पाकीट ५०० /—रूपये प्रमाणे एकुण कि. .२०,०००/—रूपये ,२) इगल हुक्का शिशा तंबखु ब्रॅन्ड एकुण २२ कंपनी पॅकबंद पाकीटे, प्रती पाकीट ६४० रू. प्रमाणे एकुण कि. .१४०८०/—रूपये —,३) रिमझीम तंबाखु ब्रॅन्ड १ किलोग्रॅम क्षमतेच्या एकुण ४० कंपनी पॅकबंद पाकीटे, प्रती पाकीट ५५० /—रूपये प्रमाणे एकुण कि. २२,०००/—रूपये ,४) रत्ना छाप तंबाखु ब्रॅन्ड एकुण १७ कंपनी बॉक्स, प्रती बॉक्स ११८० /—रूपये प्रमाणे एकुण कि.२०,०६०/—रूपये, तसेच चारचाकी वाहन एम.एच—४०/बी. जे—२४४१ किंमती .४,००,०००/—रूपये असा एकुण ४,७६,१४०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**




## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई वेलतुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— दिनांक २७/०४/२०२५ रोजी वेलतुर पोलीस हद्दीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा वेळगाव कडुन गोठणगाव कडे येणाऱ्या डांबरी रोडनी अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीसांनी वेळगाव शिवरात रोडवर नाकाबंदी केली असता एक १२ चक्का **ट्रक क्र. एम.एच.४९ ऐ.टी. ९४७१ हे वाहन मिळुन आले.** वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक आरोपी नामे सुरज भैय्याजी राऊत, वय २५ वर्षे, रा. वाकरला पोस्ट आंबोली ता. चिमुर जि. चंद्रपुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे ३ ब्रास रेती वाहतुकीचा परवाना होता परंतु वाहनामध्ये पारवान्यापेक्षा ६ ब्रास जास्त रेती होती.** पोलीसांनी पंचासमक्ष **१)**

९ ब्रास रेती  आणि **२) ट्रक क्र. एम.एच.४९ ऐ.टी. ९४७१  असा एकुण ३०,४५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद वाहन चालकाविरूध्द पोलीस स्टेशन वेंलतुर येथे  कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम ,कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंध अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— दिनांक २६/०४/२०२५  रोजी वेलतुर पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, **मौजा पिंपरी मुंजे** शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे १) विक्की गोमुजी चौधरी वय ३६ वर्ष रा शिकारपर, ३) दशरत गनीराम चाचेरकर वय ३६ वर्ष रा वेलतुर, ४) सुरज कवडु डहारे वश ३३ वर्ष रा शिकारपुर, ५) राकेश किसणा भोजनकर वय ३४ रा शिकारपुर, ६) दिलीप आंनदराव हुंडे वय ३६  वर्ष रा मेंढा हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते किंमती ५० /—रूपये, रोख रक्कम  ५,४६०/— रूपये  असा एकुण कि ५,५१०/— रूपयांचा  मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द कलम १२(अ) म. जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ४ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ४ आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्याता आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत पोलीस पेट्रोलीग करीत असतांना आरोपी नामे **इमराण मोहम्मद जान मोहम्मद अंसारी, वय २७ वर्षे, रा. चौदामैल कळमेश्वर** आणि **आरोपी नामे मोहम्मद आरीयन उर्फ अजीजुल मोहम्मद इलियास, वय २४ वर्षे, रा वडधामणा** हे मौजा १४ मैल वेना डॅम कडे जाणा—या रोडवर अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने दोन्ही आरोपीतांवर कलम २७ गुंगीकार औषधीदव्य आणि मनोवयापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन सावनेर** अंतर्गत पोलीस पेट्रोलीग करीत असतांना आरोपी नामे **तेजस केदारनाथ आकोजवार रा. सटवा माता मंदीर सावनेर** हा सटवा माता मंदीर सावनेर अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने आरोपीवर कलम २७ गुंगीकार औषधीदव्य आणि मनोवयापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत पोलीस पेट्रोलीग करीत असतांना नी आरोपी नामे **अजय सुरेशराव अवजेकर ,वय २३ रा गडेवालपूरा खापा ता . सावनेर जि नागपुर**,हा मोजी शिवधाम येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने आरोपीवर कलम २७ गुंगीकार औषधीदव्य आणि मनोवयापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**